ISBN- 978-81-951551-8-7

# भारतातील महिला सक्षमीकरणाचे विविध पैलू

Peer-Reviewed-Book Chapter

संपादक
डॉ. संगीता भांगडिया मालानी



For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# भारतातील महिला  सक्षमीकरणाचे विविध पैलू

संपादक

**डॉ. संगीता भांगडिया मालानी**

प्रथम आवृत्ती - **मार्च २०२१**

आधार पब्लिकेशन

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळासमोर,

वि.म.वि. कॉलेजच्या मागे, अमरावती

Email- aadharpublication@gmial.com

**मुखपृष्ठ संकल्पना**

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स, अमरावती

**मुद्रक**

आधार पब्लिकेशन, अमरावती

किंमत रू. २००/-

**ISBN- 978-81-951551-8-7**

**सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.**

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Working Women: Problems and Solutions | Dr. Abhay Shinde | 1 |
| 2 | SHGs: Women Empowerment and Managerial Approach | Prof. Sulakshana Hari Koli | 4 |
| 3 | Guardians of the Green -Contribution of Indian Women Environmentalist | Dr.Prachi Sharad Patharkar | 7 |
| 4 | The Role of Women in Agricultural Marketing | Dr. Durga Anil Pande | 10 |
| 5 | Women Empowerment In India With Economic Perspective | Dr. Sujata Shivaji Gadakh | 15 |
| 6 | प्रजासत्ताक भारत आणि महिलांचा मताधिकार | प्रा. डॉ. बबिता प्र. येवले | 19 |
| 7 | भारतीय समाजात महिलांची स्थिती | प्रा.डॉ.शरद जा.वाघोळे | 23 |
| 8 | भारत की नं. १ मुस्लिम महिलाएँ | डॉ. शाहेदा मुनाफ | 26 |
| 9 | महिलांचे आर्थिक सबलीकरण | प्रा.सौ.सुषमा सु. जाजु | 29 |
| 10 | भारतीय संविधान व महिला | प्रा. प्रफुल ई. ढोके | 33 |
| 11 | महिला बचतगट : समस्या व उपाय आणि सबलीकरण | प्रा.चव्हाण ओ.डी. | 38 |
| 12 | महिला सक्षमीकरणाची दशा व दिशा : ऐतिहासिक परामर्श | प्रा. शरद बाबुराव सोनवणे | 42 |
| 13 | भारतीय महिलांचा दर्जा व राजकीय सहभाग | प्रा.शहाणे रंजना प्रल्हादराव | 47 |
| 14 | ग्रामगीतेतील स्त्री विषयक दृष्टीकोण. | डॉ. प्रवीन कारंजकर | 50 |
| 15 | महिलाओं की सामाजिक व राजनीतिक उडान | डॉ.विभा देशपांडे | 56 |
| 16 | भारतीय महिलांच्या दिशा आणि दशा | डॉ. देविदास श्रीराम भगत | 59 |
| 17 | तीन तलाख कायदा आणि मुस्लीम स्त्री | प्रा.तळणीकर एस.जी. | 63 |
| 18 | घरेलू हिंसा और महिला संरक्षण अधिनियम | डॉ. सविता व्ही. रूक्के | 66 |
| 19 | पर्यावरण संरक्षणात महिलांची भूमिका | डॉ. मीना कृष्णराव रोकडे | 71 |
| 20 | आर्थिक विकासात महिलांचे योगदान | प्रा.डॉ.कृष्णा शंकर शहाणे | 76 |
| 21 | पर्यावरण संरक्षणात महिलांची भूमिका | प्रा.डॉ. दिलीप निळकंठराव लांजेवार | 80 |
| 22 | 'मुस्लीम निकाह में महिलांओ की स्थिती' | डॉ. फिरोज एस. खान | 86 |
| 23 | भारतीय समाजात महिलांची स्थिती | प्रा. स्नेहा शामकुवर | 91 |
| 24 | पंचायती राज आणि महिला सक्षमिकरण | प्रा. नथ्थु पाचुसिंग पडवाल | 96 |
| 25 | भारतीय समाजात कोलाम आदिवासी महिलांचे स्थान | प्रा.डॉ.रश्मी प्रविण गजरे | 100 |
| 26 | स्वांतत्र्योत्तर भारत में स्त्री स्वतंत्रता का विकास : विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा.सौ. प्रतिभा टावरी | 104 |
| 27 | महिला सक्षमीकरण आणि भारत सरकारच्या विविध योजना – एक अभ्यास | डॉ.ओमप्रकाश बबनराव मुंदे | 110 |
| 28 | महिला सक्षमीकरण और हमारे मौलिक अधिकार | प्रा. डॉ. कु. अंजुम नाहीद रउफ खान | 116 |

# 'पर्यावरण संरक्षणात महिलांची भूमिका'

प्रा.डॉ. दिलीप निळकंठराव लांजेवार
भूगोल विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम.

**प्रस्तावना :—**

वाढती लोकसंख्या आणि तांत्रिक प्रगती सतत पर्यावरण आणि देशाच्या नैसर्गिक संसाधनावर ताण वाढवत आहे. जमीन, पाणी, इंधन इत्यादीच्या अत्याधिक शोषणामुळे संसाधनाचा ऱ्हास झाला आहे. म्हणूनच पर्यावरण व नैसर्गिक संसाधन जतन व संवर्धन करण्यास प्रोत्साहन देणे अंत्यत महत्वाचे आहे. इंधन, अन्नधान्य, चारा, जंगल, पाणी आणि जमीन या नैसर्गिक स्त्रोतांशी महिलांचा थेट संपर्क आहे. विषेशत: ग्रामीण क्षेत्रातील ७० टक्के लोक हे प्रत्यक्ष नैसर्गिक स्त्रोतांवर अवंलबून आहेत.

पर्यावरण हा शब्द फ्रेंच शब्द 'एनिट्रस' यावरून आला आहे. पर्यावरण हे पाणी, वायू आणि जमीन यांची एकंमेकांची मानवासह इतर सजीव वस्तू आणि नैसर्गिक घटकांनी मिळून बनलेले आहे. प्राचीन काळापासून महिलांना केवळ कमकूवत मानले गेले आहे. स्त्रिया प्रामूख्याने त्यांच्या कूटूंबासाठी स्त्रोतांचे व्यवस्थापन व संवर्धनासाठी जबाबदार असतात. असे दिसून येते. जगातील जलसंपत्तीचे अन्वेशन असो किंवा वनस्पतीचे संरक्षण निर्भय स्त्रिया या कार्यात सदा अग्रेसर आहेत. १९७० च्या दषकाच्या सुरवातीस स्त्रियांची आवड आणि त्यांचा पर्यावरणाशी संबध जोडला गेला.

नैसर्गिक संसाधनातील क्षीणता आणि पर्यावरणाचा ऱ्हास याचा थेट परिणाम स्त्रियांचा वेळ, उत्पन्न, आरोग्य, आणि सामाजिक स्थितीवर होतो. महिलांना जंगलातील आयूवैदिक मूल्ये दिर्घ अनूभवाने प्राप्त झाले आहे. परंतू आज ते जगंलातल्या जगंलात नष्ट होत आहे. नैसर्गिक संसाधनाचे बेधूंद आणि निदर्यी शोषण, ज्याचा परिणाम पर्यावरण ऱ्हासावर होते आहे. जो स्त्रियावर थेट परिणाम करतो. अलीकडच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, पर्यावरण ऱ्हास व प्रदूषणाचा महिलांवर थेट परिणाम होत आहे. काही प्रदेशात काही दशकापूर्वी महिला काही मीटर अंतरावर असलेल्या जलस्त्रोता मधून दैनंदिन वापरासाठी पाण्याची गरज भागवत असत. परंतू आज हि स्थिती बिकट होत असून पाण्यासाठी महिलांना कितेक मैल पायपीट करावी लागत आहे. पर्यावरण ऱ्हासाचा परिणाम सर्वसाधारणपणे सर्वच घटकांवर होत असला तरी स्त्रिया पर्यावरण ऱ्हासाच्या मुख्य बळी ठरत आहे.

भारतातील महिला पर्यावरण संरक्षण आणि सवर्धनात महत्वाची भूमीका बजावत आहेत. आपल्या देशातील महिलांनी त्यांच्या वेगवेगळया अनूभवाच्या आधारावरून पर्यावरणाच्या सवर्धनासाठी एक वेगळा दृष्टीकोन मांडला आहे. त्यांना आर्थिक उन्नती आणि पर्यावरण यांच्यातील परस्पर संबध समजला आहे. महिलांनी जगभरातील पर्यावरणीय समस्या सोडविण्यामध्ये महत्वाची भूमीका बजावलेली आहे. सर्वसामान्य लोक पर्यावरण सरंक्षणासाठी मोठे कार्य करत असतात. महिलांना नैसर्गिक वातावरणाशी निकटचा संबध आहे. महिला, मुले तसेच उपेक्षित वर्ग विषेशत: नैसर्गिक आपत्तीच्या वेळी पर्यावरणाचा

 ISBN-978-81-951551-8-7

ऱ्हास होण्याने मुख्य बळी ठरले आहेत. अशाप्रकारे स्त्रिया पुरूशापेक्षा संरक्षणामध्ये सक्रियपणे भाग घेतात कारण पुरूषांपेक्षा स्त्रियांवर थेट पर्यावरणाचा प्रभाव पडतो. पर्यावरण संरक्षणात महिला अनेक सरकारी व गैर सरकारी वनीकरण आणि पर्यावरण कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्या आहेत.

**भारतीय महिलांच्या नेतृत्वात पर्यावरणीय चळवळी**

**१) चिपको चळवळ :**

चिपको आंदोलन हे झांडाना वाचविण्यासाठी झालेले आंदोलन होते. यामध्ये वृक्षतोडीचा विरोध करण्यासाठी स्त्रियांनी सहभाग नोंदविला व तोड होणाऱ्या वृक्षाला कवटाळून ठेवले. या आंदोलनामुळे शेकडो झाडांची कत्तल, हजारो पक्षी, व प्राण्यांची निवासस्थाने वाचली.

एप्रिल १९७३ मध्ये अलकनंदा खोऱ्यातील मंडल गावात चिपको आंदोलनाची सुरूवात झाली. अलकनंदा खोऱ्यातील जंगलाचा एक भूभाग क्रीडा साहित्य तयार करणाऱ्या एका कंपनीला देण्याच्या सरकारच्या निर्णयाला विरोध करण्यातून आंदोलन उभे राहिले. जंगलातील तब्बल अडीच हजार झाडांचा लिलाव त्यावेळी करण्यात आला तेव्हा गावातील आंदोलकांनी याचा विरोध केला. त्यात गौरादेवी, सुदेशादेवी, बचनीदेवी यांच्यासारख्या स्त्रिया हिरीरीने उतरल्या. गौरादेवीने गावागावात फिरून स्त्रियांना एकत्र आणले आणि जंगलात चिपको आंदोलन सुरू केले. ठेकेदार झाड कापायला असंख्य माणसं घेऊन आला की त्या झाडाला मिठया मारून उभ्या राहायच्या आणि 'पेड कटने नही देंगे' च्या घोषणा द्यायच्या. तरी ही लिलाव झालाच. ठेकेदारांना लोकांच्या विरोधाची कल्पना होती. त्यांनी कार्यकर्त्यांना लोकांची जुनी देणी देण्याच्या निमित्ताने चामोली या ठिकाण बोलावून घेतले. त्यांच्या गाफीलपणाचा गैरफायदा घेऊन त्यांनी गुपचुप रेनीच्या जगंलात मजुर पाठविले. एका छोट्या मुलांने झाडांची कत्तल करण्यासाठी आलेल्या मजुरांना पाहिले आणि धावत येऊन गावात ही खबर दिली. पण गावात फक्त १५–२० स्त्रिया आणि काही छोटी मुले होती. पुरूष मंडळीना निरोप कळवून ते परत येईपर्यंत दोन–तिन दिवस लागणार होते. तोपर्यंत जंगलतोड अटळ होती. हे लक्षात येताच गावातील महिला आपल्या मुलांसह जंगलात आल्या. महिलांसह सगळी लहान मुल झाडाला चिकटून उभी राहिली. ठेकेदारांनी स्त्रियांना विनयभंग करण्याच्या धमक्या दिल्या पण एकाही स्त्रिने ठेकेदारांच्या धमक्यांना भीक घातली नाही. शेवटी मजूरांनी माघार घेतली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी भारतात झालेले हे पहिलेच अनोखे आंदोलन होते. पुढे हे आंदोलन चिपका आंदोलन म्हणून ओळखले जाऊ लागले.

**२) अप्पिको चळवळ :**

अप्पिको चळवळ ही कर्नाटकातील पश्चिम घाटांच्या जगंलाचे संरक्षण करण्यासाठी एक महत्वाचे पर्यावरण संवर्धन आंदोलन आहे. अप्पिको आंदोलन पांडूरग हेगडे यांनी १९८३ मध्ये कलाकानाच्या जगंलाच्या पश्चिम घाटातील गावातील पुरूष आणि स्त्रियांनी वृक्षांना मिठी मारली. औद्योगिक विकासासाठी जगंल तोडण्याच्या सरकारच्या धोरणा विरोधात हे आंदोलन केले. महिलांनी जंगल वाचविण्यासाठी महिला मंडळाची स्थापना करून सरकारला जंगलतोड थांबविण्यासाठी सरकारला निवेदन दिले. यासाठी ग्रामीण आदीवासी महिलांनी पद्यात्रा, रोडशो, लोकनृत्य, पथनाट्य आणि नाटकांद्वारे जनजागृती कार्यक्रम

आयोजित केले. लोकांच्या तीव्र विरोधामूळे शासनानाला पश्चिम घाटावरील औद्योगिक धोरण थांबविणे भाग पडले.

**३) मूक व्हॅली चळवळ :**

केरळमधील पश्चिम घाटाच्या दक्षिणेकडील सायलेंट व्हॅली ही जैवविधतेचे एक महत्वाचा आकर्षण आहे. मूक व्हॅली चळवळ मौन व्हॅली जंगलात जलविद्युत प्रकल्पासाठी धरणाच्या बांधकामाच्या केरळ सरकारने घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात होती, या चळवळीतील मल्याळम कवी आणि पर्यावरणतज्ञ सुगाथा कुमारी या प्रमुख नेत्या होत्या, या क्षेत्रात रोजगार आणि विकासाची मागणी असूनही लोक विशेषत: महिलांनी जलविद्युत प्रकल्पाला विरोध दर्षविला, तेव्हा १९८० मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या वैयक्तिक हस्तक्षेपामूळे हा प्रकल्प रदद् करण्यात आला आणि १९८४ मध्ये सायलेंट व्हॅलीला राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले.

**४) नर्मदा बचाओ आंदोलन :**

जागतिक बॅकेच्या अर्थसहाय्याने नर्मदा नदी काठावर अनेक धरणे बांधण्याच्या विरोधात नर्मदा बचाओ आंदोलन हि पर्यावरण चळवळ उभी राहिली आहे. गुजरात, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या तीन राज्यात पसरलेल्या सरदार सरोवर धरणाच्या बाधंकामाचा परिणाम या भागातील पर्यावरण व वस्तीवर होतो आहे. मेधा पाटकर, बाबा आमटे आणि अरूंधती रॉय यांच्या नेतृत्वात या विरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर निषेध नोदंविला आहे. यासाठी जगभरातील स्वंयसेवी संस्थाचे पाठबळ लाभले आहे. परंतू जागतिक बॅकेने प्रकल्प मागे घेण्याचा तीव्र विरोध केला आहे. तसेच यासंदर्भाने कोर्टात खटला सुध्दा चालू आहे.

**५) नवदान्य चळवळ :**

नवदान्य ही भारतातील सर्वात मोठी सेंद्रिय चळवळ आहे. नवदान्यानी १९८४ मध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरणषास्त्र संषोधन संस्थाचा एक कार्यक्रम म्हणून सुरूवात केली, जो पर्यावरणीय सक्रियतेला दिषा आणि आधार देण्यासाठी सहभागात्मक संषोधन उपक्रम आहे. नवदान्य म्हणजे नऊ पिके जे भारताच्या अन्न सुरक्षा संरक्षणाचे सामूहिक स्त्रोत प्रतिनिधित्व करतात. नवदान्याचे मुख्य उदिश्ट हे आहे की, बायोपिरॅसिटी पासून बियाणे वाचविणे. या उद्‌षाने भारतातील १७ राज्यात १११ सामुदायिक बियाणे बॅकेची सुरूवात करणे हे आहे. आनुवंषिकरित्या सुधारित बियाण्याविरूध्द जोरदार मोहिम राबवित आहेत आणि जैवविविधता संवर्धनात सक्रियपणे भाग घेत आहेत. नवदान्य चळवळीतील सदस्य ह्या देषातील विविध भागातील महिला षेतकरी आहेत.

**भारतातील पर्यावरण चळवळीतील महिला नेतृत्व :**

महिलांचा पर्यावरणाषी अविभाज्य संबध आहे. म्हणूनच पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाच्या उद्‌देशाने कोणत्याही उपाययोजनासाठी महिला आवश्यक आहेत. पूर्वी पासूनच स्त्रियांनी पर्यावरण चळवळीत मोठे योगदान दिले आहे.

**१) अमृता देवी :—**

भारतातील राज्यस्थान राज्यातील एका महिलेने सुमारे [illegible] वर्षापूर्वी पर्यावरण वाचविण्यासाठी लढाउभारला हि भारतातील सर्वात प्रथम घडलेली घटना म्हणावी लागेल बिश्नोई समाजातील अमृता देवी यांनी जोधपुरच्या राजासाठी बांधल्या जात असलेल्या राजवाडयाला विरोध केला कारण या राजवाडया साठी शेकडो हेक्टर जमीनीवरील वृक्षतोडण्यात येत होते. याचा विरोध म्हणुन त्यांनी झाडाला अलींगन दिले परंतू सैनिकांनी झाडांन सोबतच त्यांची सुध्दा त्यात कत्तल केली. त्यानंतर स्थानिक लोकांनी मोठ्या प्रमाणात निदर्शने केली. त्यांनतर तेथील राजाने येथील लोकांना जंगल न तोडण्याचे वचन दिले. याप्रकारे भारतात सर्वप्रथम एका महिलेच्या नेतृत्वात पर्यावरण संरक्षणासाठी सर्वात प्रथम उभारलेला लढा आहे.

**२) गौरा देवी** :—

हिमाचल प्रदेशातील रेणी या गावातील महिला दलाच्या प्रमुख गौरी देवी यांच्या नेतृत्वात चिपको आंदोलन सुरू केले. त्यांनी महिलांना झाडांना घट्ट मिठी मारण्यासाठी आणि झांडाची कत्तल रोखण्यासाठी संघटित केले. ज्या दिवशी लाकुडतोडे लोक झाडे तोडणार होते त्या दिवशी गौरी देवीने २७ महिलांसह त्यांच्याशी सामना केला. सुरूवातीला त्यांनी त्या लोकांशी बोलण्याचा प्रयत्न केला परंतू लाकुडतोडयांनी त्यांना शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. लाकुडतोडयांना वृक्ष तोडण्यापासून परावृत्त करण्यासाठी आपल्या सोबतच्या २५ महिला सह झांडाना मिठी मारली. त्यामूळे लाकुडतोडयाचा नाईलाज झाला त्या लोकांनी आत्मसमर्पण केले आणि निघून जाईपर्यंत त्यांनी रात्रभर झाडाचे रक्षण केले. या चळवळीची बातमी लवकरच शेजारच्या गावात पसरली आणि लोक त्यात सामील झाले. उत्तराखंडच्या इतर भागातही अशाच प्रकारची पुनरावृत्ती झाली आणि अशा प्रकारे महिलांना पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**३) मेधा पाटकर** :—

मेधा पाटकर हया लोकप्रिय पर्यावरणवादी म्हणून परिचीत आहेत. त्यांच्या नेतृत्वात नर्मदानदीवरील धरण बांधण्याच्या विरोधात एक मोठे जनआंदोलन उभे केले आहे. प्रस्तावित सरदार सरोवर धरण हजारो कोटीचा प्रकल्प असून यामुळे ३२०००० पेक्षा जास्त लोक विस्थापीत झाले आहेत या लोकांचे पूर्वसन करण्यासाठर परकीय निधिचा वापर केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. येथील स्थानिक लोकांना सुध्दा या पुर्ण प्रकल्पाची माहिती नसल्याची बाब समोर आली आहे. १९८९ मध्ये मेधा पाटकर यांनी 'नर्मदा बचाव आंदोलनाची स्थापना केली आणि तेव्हापासून त्या या आंदोलनाशी जुळलेल्या आहेत. या प्रकल्पाचा निषेध करण्याचा एक शांततापूर्ण मार्ग म्हणून त्यांनी अनेकदा उपवास केला आहे. नर्मदा बचाव आंदोलनाच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्त लोकांनामध्ये जनजागृती निर्माण करण्याचे प्रयत्न त्या करत आहेत.

**४) सुनीता नारायण** :—

सुनीता नारायण या पर्यावरणवादी, लेखीका आणि राजकीय कार्यकर्त्या आहेत. तसेच 'सेटंर फॉर सायन्स अॅन्ड एनव्हायरॉनमेन्ट' या संस्थेच्या संचालिका तसेच 'डाऊन टू अर्थ' या मासिकाच्या संपादक आहेत. १९८० च्या आसपास सुनीता यांनी अनिल अग्रवाल या पर्यावरण तज्ज्ञाबरोबर काम सुरू केले व १९८५ मध्ये अग्रवाल यांच्यासह त्यांनी 'भारतातील

ISBN-978-81-951551-8-7
Peer-Reviewed Book Chapter March ,2021

केला . भारतातील पर्यावरणाचे
पर्यावरणाची स्थिती' या विषयावर एक अहवाल संपादीत केला . भारतातील पर्यावरणाचे
प्रश्न येथील गरीबांच्या दृष्टीने का महत्वाचे आहेत ते या अहवालात नोंदविले आहे. अनिल
अग्रवाल यांच्यासह त्यांनी ग्रामीण भागातून वनीकरणाच्या चळवळीत भाग घेतला. व
हवामानाच्या प्रश्नाचा अभ्यास केला. यादरम्यान स्थानिक जंगलाचे व्यवस्थापन आणि
जागतिक हवामानाचे व्यवस्थापन हे निगडित असल्याची नोंद केली सरिस्का व्याघ्र
प्रकल्पातील वाघांची संख्या कमी झाल्यानंतर वाघाच्या संवर्धनासाठी कृती आराखडा तयार
करण्याचे काम 'टायगर टास्क फोरम' या संस्थेने केले. पंतप्रधानाच्या सूचनेनुसार त्यांनी या
फोरमचे अध्यक्षपद भूषविले आहे. तसेच ' प्राईम मिनिस्टर्स कौन्सिल ऑन क्लायमेट चेंज'
आणि गंगा नदीच्या शुध्दीकरणासाठी स्थापन झालेल्या 'गंगा रिव्हर बेसिन' ऑथॉरिटीच्या
सदस्या आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित
केले आहे.

**५) वंदना शिवा :—**

वंदना शिवा या भारतीय तत्वज्ञ, पर्यावरणवादी कार्यकर्त्या व लेखिका आहेत. त्यांनी २० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. त्या इंअरनॅशनल फोरम ऑन ग्लोबलायझेशन या संघटनेच्या संचालक मंडळावर आहेत. १९७० च्या दशकात वंदना शिवा यांनी अहिंसात्मक चिपको आंदोलनात भाग घेतला होता. त्यांनी अनेक परंपरागत पध्दती वैज्ञानिक स्वरूपात सादर केल्या आहेत. वंदना शिवा यांनी कृषी आणि अन्नधान्य व्यवहारामध्ये बदल घडविण्यासाठी संघर्ष केला आहे. बौध्दिक संपदा अधिकार, जैव विविधता, बायो टेक्नॉलॉजी, जैविकशास्त्र, अभियांत्रीकी या क्षेत्रात त्यांनी बौध्दीक स्वरूपात आणि कार्यकर्त्या म्हणून योगदान दिले आहे. आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरीका, आयर्लन्ड, स्विर्झलॅन्ड आणि ऑस्ट्रेलियातील ग्रीन चळवळीतील तळागाळातल्या संघटनाना त्यांनी अनुवांशिक अभियांत्रिकीद्वारे कृषी, विकासामधील प्रगती विरोधात मोहीम चालू केली आहे. १९८२ मध्ये त्यांनी रिसर्च फाऊंडेशन फॉर सायन्स टेक्नॉलॉजी अॅन्ड इकोलॉजीची स्थापना केली. १९९१ मध्ये त्यांनी नवज्ञानाची निर्मिती केली. जीवनावश्यक संसाधनाचा विशेषत: देशी जाती, जैविक शेती यांचा सुयोग्य वापर वाढविण्यासाठी विविधता आणि एकात्मतेचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय चळवळ उभी केली. विविध प्रकारच्या शेतीतील प्रादेशिक वाणांना संधी देण्यासाठी भारतभरात ४० बियाणे बँकाची स्थापना केली. २००४ मध्ये शिव शुमाकर कॉलेज, यु के यांच्या सहकार्याने डूनव्हॅली मध्ये शाश्वत जीवन जगण्यासाठी आंतरराष्ट्रीय विद्यालयाच्या बिज विसनेसची स्थापना केली.

**६) राधा भट्ट :**

दुर्गम पहाडी भागातल्या स्त्रिया आणि पर्यावरणाचे रक्षण करू पाहणाऱ्या गांधीवादी
विचारसरणीच्या राधा भट्ट यांनी उत्तराखंड मध्ये नदी बचाओ अभियानात नदीवरील निर्माण
करण्यात येत असलेल्या धरण व जलविद्युत प्रकल्पाच्या विरोधात आवाज उठवला आहे.
त्यांनी गंगा नदी व तिच्या सहाय्यक नद्याच्या खोऱ्याच्या भागाची पाहणी करून या
जलविद्युत प्रकल्पामूळे हिमालयातील जंगलतोडीमूळे मोठया प्रमाणात धोका निर्माण होत
आहे असे त्यांनी नमूद केले असून त्यासाठी त्यांनी २००० किलोमीटर पैदल मोर्चाचे नेतृत्व
सुध्दा केले आहे.

ISBN-978-81-951551-8-7

**निष्कर्ष :—**

पर्यावरण संरक्षणामध्ये महिलांनी नेहमीच महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. शिवाय, महिला वाढती लोकसंख्या नियंत्रीत करण्यात मोठया प्रमाणात कार्य करू शकतात. कारण पर्यावरणीय संसाधनाच्या दोहना मध्ये या वाढत्या लोकसंख्येचा मोठा भार आहे. घरगुती आणि सामुदायिक उर्जा गरजा भागविण्यासाठी महिलांनी नेहमीच महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. अपुरे उर्जा संसाधने आणि उर्जा वापराच्या कार्यक्षम तंत्रज्ञानाची कमतरता लोकांना त्यांच्या दैनदिन गरजा पूर्ण करण्यासाठी स्वत:चे श्रम, प्राणी शक्ती आणि जैवऊर्जा यावर अवलंबून राहण्यास भाग पडेल. पुरेसे पर्यावरणीय शिक्षण आणि जागरूकता असलेल्या स्त्रिया पुरूषांच्या तुलनेत ऊर्जा संसाधनाचे कार्य अधिक कार्यक्षमतेने करू शकतात. योग्य शिक्षण आणि प्रशिक्षण घेतल्यास पाणी, अन्न व वायुजन्य रोगांच्या घटना कमी करता येतील. पारंपारिकपणे महिलांना निर्णय घेण्याच्या अधिकारापासून दुर ठेवले गेले. तसेच त्यांच्या शिक्षणातील असमानता व सर्व स्तरावर निर्णय घेण्याच्या अधिकाराअभावी समाजातील त्यांचे स्थान कमी झाले आहे. परिणामी त्यांचे उत्पन्न, पोषण, आरोग्य, सामाजिक सहकार्य आणि घरगुती ज्ञानावर विपरीत परिणाम झाला आहे. महिला व्यावहारिकदृष्टया निसर्गाच्या अगदी जवळ असल्याने, त्या नेहमीच पर्यावरणीय विषयांना चागंल्या प्रकारे जाणण्यास सक्षम असतात. स्त्रिया सुविधांच्या संभाव्य उपभोक्ता असल्याने पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या नियोजन व त्यासाठी नियोजन करताना त्यांच्या मतांचा विचार करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :—**


१) डॉ. घारपुरे विठ्ठल, पर्यावरणशास्त्र, पिपंळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, महाल नागपुर, जुन २००५

२) प्रा. ए. पी. चौधरी/प्रा. सौ. अर्चना चौधरी, संपूर्ण पर्यावरणशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव,

२०१२

३) उमेश उमाठे/रेखा ठाकरे , पर्यावरणशास्त्र, विसा बुक्स, नागपुर, ऑगस्ट २००६

४) वृत्तपत्रे व मासिके.

५) Dankelman. I and Davidsin.J (1997) women and enviroment in the third world, Earthscan publication.

६) Bhatt C.P. (1992) 'Chipko Andolan, forest Conservation Based on People's , Enviroment and Urbanization.